# कै. विनायकदादा पाटील यांना

**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची विनम्र श्रद्धांजली**



नाशिकचे माजी आमदार, नाशिक शहराचे लोकप्रिय नेते, शब्दप्रभू आणि उत्कृष्ट वक्ता म्हणून ओळख असलेले विनायकदादा पाटील यांचे नुकतेच दुःखद निधन झाले. या विद्यापीठाच्या सर्व शिक्षक, अधिकारी आणि कर्मचारी यांच्या वतीने त्यांना विनम्र श्रद्धांजली!

मा. शरद पवार साहेब मुख्यमंत्री असताना १९८९ मध्ये, डॉ. राम ताकवले यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांना यश आले आणि नाशिक येथे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या स्थापनेस राज्य सरकारने अनुमती दिली. त्यावेळी डॉ. ताकवले यांना मा. शरद पवार साहेबांनी सांगितले, “तुम्ही नाशिकला जाऊन विनायकदादा पाटील यांना भेटा. ते संपूर्ण मदत करतील”. त्याप्रमाणे डॉ. ताकवले यांनी विनायाकदादांची भेट घेतली आणि लगेच कामाला गती आली. सर्वप्रथम विनायकदादांनी कॉलेज रोडवरची डागा वकिलांची तीन मजली इमारत भाड्याने घेऊन दिली. तिथे विद्यापीठाचे कार्यलय सुरु झाले. नंतर मंत्रालयातील नगररचना विभागातून आदेश मिळवून तत्कालीन जिल्हाधिकारी यांच्याकडे जागेसाठी सतत पाठपुरावा केला. अखेर, गोवर्धन शिवारातील १५० एकर जागा विद्यापीठाला मिळवून दिली. त्यानंतरही वारंवार उद्भवणाऱ्या अर्थिक अडचणीत शासनाकडे पाठपुरावा करून वेळोवेळी अनुदाने मिळवून दिली.

भारतीय कृषी संशोधन परिषदेची मुक्त विद्यापीठाच्या कृषी विभागास मंजुरी आणण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. अशी मान्यता मिळवणारे हे एकमेव विद्यापीठ होते. कॅनडा येथील कॉमन वेल्थ ऑफ लर्निंग यांचा सर्वोत्कृष्ट विद्यापीठ म्हणून गौरव प्राप्त करण्यात ‘मुक्त शिक्षणातून कृषी शिक्षण’ हे एक मोठे कारण होते.

विद्यापीठाच्या पहिल्या व्यवस्थापन मंडळावर काम करताना प्रत्येक बाबतीत उच्चतम दर्जा कसा राखला जाईल याची ते काळजी घेत असत. अन्य विद्यापीठांपेक्षा वेगळेपण सिद्ध करणारे अनेक निर्णय विनायकदादांच्या आग्रहामुळे झाले.

विद्यापीठाच्या स्थापनेपासून सर्व महत्वाच्या कार्यक्रमात ते उपस्थित राहात असत आणि त्यांचे रोचक, उद्बोधक आणि खुसखुशीत भाषण ऐकण्यासाठी श्रोते उत्सुक असत.

विनायकदादा यांच्या वनएरंडी आणि निलगिरी वरील मौल्यवान संशोधनासाठी महाराष्ट्र शासनाने त्यांना वनाधिपती हा बहुमान प्रदान केला होता. त्या कार्यक्रमास विद्यापीठातील तत्कालीन संचालक मंत्रालयात उपस्थित होते.

विद्यापीठाच्या वतीने कुलगुरू डॉ. ई. वायुनंदन, कुलसचिव डॉ. दिनेश भोंडे, वित्त अधिकारी श्री. मगन पाटील, परीक्षा नियंत्रक श्री शशिकांत ठाकरे, सर्व शिक्षक, अधिकारी आणि सर्व कर्मचारी यांनी विनम्रतेने श्रद्धांजली वाहिली आहे.